# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

मा.प्रशासक ठराव क्र.३६ विषय क्रमांक- ३६
दिनांक-२३/०२/२०२४ विभाग - सा.बांधकाम विभाग

कार्यसुची क्रमांक - ५

| | |
|---|---|
| विषय क्र.-३६ दिनांक- २३/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिका, सन २०२२-२०२३ करीता सण ,उत्सवा करीता मंडप,स्टेज,बॅरेकेटींग,शामीयाना व इतर कामाकरीता वार्षिक निविदा च्या देयक अदा करणे बाबत. |
| ठराव क्र.-३६ दिनांक- २३/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिका, सन २०२२-२०२३ करीता सण ,उत्सवा करीता मंडप,स्टेज,बॅरेकेटींग,शामीयाना व इतर कामाकरीता वार्षीक निविदा रू.९५ लक्ष ची ई निविदा क्र.८०७७१९ प्रसिध्द करण्यात आली होती.सदरच्या निविदेस मा.स्थायी समिती सभा क्र.८ विषय क्र.९२ दिनांक ०१/०९/२०२२ नुसार रक्कम रूपये ३० लक्ष पर्यतच्या खर्चास मान्यता दिलेली आहे.व रू.३० लक्षा पेक्षा जास्त खर्च झाल्यास मा.स्थायी समितीचे मंजूरीसाठी पाठविण्यात यावी असा ठराव मंजुर झालेला आहे.सदर कामाकरीता प्रस्तावात नमुद जादा खर्च रक्क्म रूपये १९,२४,५६८/- कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स ,अहमदनगर यांच्या नांवे अदा करणेस तसेच सन २०२३-२४ करिता वार्षिक निविदा प्रस्तावित असुन जोपर्यत सदर निविदा अंतिम होत नाही तोपर्यत मंजुर निविदाधारक कैलास मंडप ॲण्ड डेकोरेटर्स यांच्या मंजूर दराने आवश्यक काम करून घेण्यास व पुढील अतिरीक्त रू ३० लक्ष पर्यतच्या खर्चास तसेच जिल्हा प्रशासनाच्या वतीने मनपास सदर कामाकरीता अंदाजे रक्कम रूपये ३५लक्ष खर्च करावा लागतो.हा होणारा खर्च जिल्हा प्रशासन,नियोजन समितीकडे मागणी प्रस्ताव पाठविण्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे. |
| निर्णयः- | महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

**सही/-**
(मेहेर लहारे)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका,

**सही/-**
(डॉ.पंकज जावळे)
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका,

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

मा.प्रशासक ठराव क्र.३७ | विषय क्रमांक- ३७
दिनांक-२३/०२/२०२४ | विभाग - सा.बांधकाम विभाग

कार्यसुची क्रमांक - ५

| | |
|---|---|
| विषय क्र.-३७ दिनांक- २३/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिका,विना परवानगी अनाधिकृत रस्त्यावर खोदकाम करून सार्वजनिक रस्त्याचे नुकसान केलेबाबत महानगरपालिकेने केलेल्या दंडात्मक रक्कम निर्लेखित करणे बाबत. |
| ठराव क्र.-३७ दिनांक- २३/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग,वॉर्ड क्र.१ मधील नालेगांव कुंभार गल्ली भागातील घ.नं.९७ सि.स.नं.६०७२ (अ) श्रीमती यमुनाबाई बाळासाहेब भागवत,श्री.अरूण बाळासाहेब भागवत व इतर यांनी विनापरवाना सार्वजनिक व समाईक रस्त्याचे अंदाजे १५० फुट लांब व १ फुट रूंद खोदकाम करून रस्त्याचे नुकसान केल्याने या बाबत श्री.संभाजी द.सुसरे यांनी तक्रार दाखल केली.त्यानुसार उप अभियंता यांनी दंडात्मक प्रस्तावा सादर केला असता मा.आयुक्त साहेब यांनी रक्कम रूपये ४०,०००/- दंड आकरणी करून रक्कम भरणे बाबत कळविण्यात आले होते.सदरचा भरणा प्रभाग समिती क्रमांक २ शहर वसुली विभाग यांच्या कडे करण्या बाबत आदेशीत करण्यात आले .व विभागाने सदरची रक्कम मालमत्ता कराच्या बिलामध्ये समाविष्ठ करण्यात आली.त्यानंतर श्रीमती यमुनाबाई बाळासाहेब भागवत,श्री.अरूण बाळासाहेब भागवत यांनी अर्ज देवून आम्ही अल्प प्रमाणात रस्ता खोदला असून सदरचा रस्ता स्वखर्चाने कॉक्रीटीकरण करून दुरूस्त केलेला आहे.आम्हाला करण्याला आलेला दंड माफ करण्यात यावा अशी मागणी केली त्यानुसार.उपअभियांता यांनी दंडात्मक रकमे बाबत मा.आयुक्त साहेब यांनी रक्कम रूपये ५०००/- कायम ठेवून उर्वरीत रक्कम रू.३५,०००/- शमपित करणेस व त्याप्रमाणे निर्लेखीत करणे बाबत दिनांक १/१/२०२४ अन्वये मान्यता दिलेली असून महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम १५२ नुसार वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करण्यास मा.प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे. |
| निर्णयः- | महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

**सही/-**
(मेहेर लहारे)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका,

**सही/-**
(डॉ.पंकज जावळे)
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका,

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

मा.प्रशासक ठराव क्र.३८ — विषय क्रमांक- ३८

दिनांक- २३/०२/२०२४ — विभाग - अर्थ विभाग

कार्यसुची क्रमांक - ५

<table>
<tr><td>विषय क्र.-३८<br>दिनांक-<br>२३/०२/२०२४</td><td>अहमदनगर महानगरपालिका,प्रकल्प विभागाकडील सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबत.</td></tr>
<tr><td>ठराव क्र.३८<br>दिनांक-<br>२३/०२/२०२४</td><td>अहमदनगर महानगरपालिका सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी " या लेखाशिर्षकामध्ये रू.१.०० ोटीची तरतुद करण्यात आली आहे.या तरतुदी मध्ये खर्च वजा जाता रू.२४,०५,०२१/-इतकी तरतुद शिल्लक आहे.परंतु सदर कामा पोटी एकुण रक्कम रू.४,७०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्याने "स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी " या लेखाशिर्षकामध्ये आणखी रू.४.०० कोटीची तरतुद करणे आवश्यक आहे.<br>प्रकल्प विभागाकडील "सर्वासाठी घरे" या लेखाशिर्षकामध्ये रू.३५.०० कोटीची तरतुद करण्यात आली आहे.यापुर्वी झालेला खर्च वजा जाता या लेखाशिर्षाअंतर्गत रू.३१.२५ कोटी इतकी तरतुद शिल्लक आहे.त्यामुळे विषयांकीत कामासाठी "स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी " या लेखाशिर्षकाची तरतुद रू.१.०० कोटी ऐवजी रू.५.०० कोटी इतकी करणेस अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ चे मंजुर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदानात वाढ /घट करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ व अनुसुची "ड" मधील प्रकरण ७ मधील २ (२) (अ)(ब)(क) अन्वये प्रकल्प विभागाच्या प्रस्तावास लेखा विभागाकडून सादर करण्यात आलेल्या तक्त्यानुसार सन २०२३-२०२४ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मा.प्रशासक यांची शिफारस देण्यात येत आहे. अखेर मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.
<table>
<tr><th>अ क्र</th><th>लेखाशिर्षकाचे नांव</th><th>सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकातील तरतुद</th><th>झालेला खर्च</th><th>यापुर्वी वर्ग केलेली तरतुद</th><th>शिल्लक तरतुद</th><th>वर्ग करावयाची तरतुद</th><th>सुधारीत तरतुद</th></tr>
<tr><td>१</td><td>सर्वासाठी घरे</td><td>रू.३५.००</td><td>०.५४</td><td>३.७५</td><td>३०.७१</td><td>४.००</td><td>२७.२५</td></tr>
<tr><td>२</td><td>स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी</td><td>१.००</td><td>०.७६</td><td>०.००</td><td>०.२४</td><td>४.००</td><td>५.००</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>निर्णयः-</td><td>महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.</td></tr>
</table>

**सही/-**
(मेहेर लहारे)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका,

**सही/-**
(डॉ.पंकज जावळे)
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका,

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

मा.प्रशासक ठराव क्र.३९ | विषय क्रमांक- ३९
दिनांक - २३/०२/२०२४ | विभाग - अर्थ विभाग

कार्यसुची क्रमांक - ५

**विषय क्र.-३९ दि.२३/०२/२०२४**

अहमदनगर महानगरपालिका,सार्व .बांधकाम विभागाकडील सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबत.

**ठराव क्र.३९ दिनांक- २३/०२/२०२४**

अहमदनगर महानगरपालिका सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षासाठी "अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे " या लेखाशिर्षकात रक्कम रूपये २२.९३ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.मात्र सदरची तरतुदीतून आज अखेर रक्कम रूपये २२,८३,५९,७७०/-इतक्या रकमेचे प्रस्ताव खतविण्यात आलेले असून रक्कम रू.१०,४०,२३०/- इतकी शिल्लक आहे. "अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे " या लेखाशिर्षामध्ये रक्कम रू.३.०० कोटी व "विकासभार " या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १.०० कोटी इतकी करणेस अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ चे मंजुर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदानात वाढ /घट करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ व अनुसुची "ड" मधील प्रकरण ७ मधील २ (२) (अ)(ब)(क) अन्वये सार्व.बांधकाम विभागाच्या प्रस्तावासा प्रस्तावास लेखा विभागाकडून सादर करण्यात आलेल्या तक्त्यानुसार सन २०२३-२०२४ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मा.प्रशासक यांची शिफारस देण्यात येत आहे. अखेर मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | २०२३-२४ ची मुळ तरतूद (लाखात) | यापुर्वीचा खर्च (लाखात) | शिल्लक (लाखात) | प्रस्तावित केलेली वाढीव रक्कम (लाखात) | एकुण तरतूद (लाखात) (३+६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रकमेतून कामे करणे | २२९३.०० | २२८२.६० | १०.४० | ३००.०० | २५९३.०० |
| २ | विकासभार | ६००.०० | ५९९.७७ | ०.२३ | १००.०० | ७००.०० |

सदर तरतूदीमध्ये वाढ करणेसाठी खाली नमुद लेखाशिर्षातून चालू आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेली तरतूद कमी करणेस हरकत नाही.

| अ.क्र | लेखाशिर्ष | २०२३-२४ ची मुळ तरतूद (लाखात) | यापुर्वीचा खर्च (लाखात) | शिल्लक (लाखात) | प्रस्तावित केलेली वाढीव रक्कम (लाखात) | एकुण तरतूद (लाखात) (३+६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | रस्ते खोदाई फि मधुन रस्ते करणे / दुरूस्ती | १८५०.०० | १३२४.०६ | ५२५.९४ | ४००.०० | १४५०.०० |

**निर्णयः-**

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

**सही/-**
(मेहेर लहारे)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका

**सही/-**
(डॉ.पंकज जावळे)
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका